सकाळ

गुरूवार २७ मार्च २०२५




पत्रकार भवन, नवी पेठ : ज्येष्ठ पर्यावरणतज्ज्ञ डॉ. माधव गाडगीळ यांच्या हस्ते पहिला 'राम नदी सेवक' सन्मान डॉ. श्रीनिवास वडगबाळकर यांना देण्यात आला. या वेळी (डावीकडून) वीरेंद्र चित्राव, डॉ. गाडगीळ, डॉ. वडगबाळकर, आनंद चितळे आणि गुरुदास नुलकर.

# नद्यांविषयी प्रश्नांच्या मुळाशी जाणे गरजेचे

## डॉ. गाडगीळ : 'किर्लोस्कर वसुंधरा राम नदी महोत्सवा'चा समारोप

पुणे, ता. २६ : "प्रदूषण नियंत्रणाच्या प्रयत्नांसाठी शासकीय स्तरावर मोठे आकडे जाहीर होतात. वास्तवात प्रदूषण नियंत्रणाबाबतीत नक्की काय काम होते, याच्या शासकीय निष्पत्ती लेखापरीक्षणासह नागरिकांनीही लेखापरीक्षण करणे आवश्यक आहे. नद्या शुद्धीकरणाबाबतीत अभियान घोषित करणे पुरेसे नसून, प्रश्नाच्या मुळाशी जाऊन काम करण्याची आवश्यकता आहे," असे प्रतिपादन ज्येष्ठ पर्यावरणतज्ज्ञ डॉ. माधव गाडगीळ यांनी केले.

किर्लोस्कर वसुंधरातर्फे आयोजित पाचव्या ऑनलाइन 'किर्लोस्कर वसुंधरा राम नदी महोत्सवा'च्या समारोपप्रसंगी बुधवारी (ता. २६) राम नदीचे अभ्यासक डॉ. श्रीनिवास वडगबाळकर यांना डॉ. गाडगीळ यांच्या हस्ते पहिला 'राम नदी सेवक' सन्मान प्रदान करण्यात आला. त्यावेळी डॉ. गाडगीळ बोलत होते. यावेळी किर्लोस्कर वसुंधराचे आनंद चितळे, डॉ. गुरुदास नूलकर आणि संयोजक वीरेंद्र चित्राव आदी उपस्थित होते.

डॉ. गाडगीळ म्हणाले, "नदीचे प्रदूषण होते, तेव्हा ते केवळ जलप्रदूषण नसते; तर त्यातील वनस्पती, प्राण्यांवर त्याचे दुष्परिणाम होतात. त्या घटकांच्या होणाऱ्या प्रदूषणाचा अभ्यास होणे आवश्यक आहे. साधारण १९५२च्या सुमारास मी नळ स्टॉपजवळ राहत असताना मुठा नदीमध्येही मी पोहण्यासाठी जायचो, इतके त्या नदीचे पाणी त्यावेळी निर्मळ होते. आता त्या गोष्टीची कल्पनाही करवत नाही."

चित्राव यांनी प्रास्ताविक केले. अनिल गायकवाड यांनी सूत्रसंचालन केले.

### सामूहिक जबाबदारी : डॉ. वडगबाळकर

■ डॉ. वडगबाळकर म्हणाले, "पर्यावरण संवर्धन, जतन आणि संरक्षण ही आपली सामूहिक जबाबदारी असून, ते आपण कर्तव्य भावनेने केले पाहिजे. राम नदीच्या आजूबाजूला असलेल्या नैसर्गिक स्रोतांचा शोध घेऊन त्याचे जतन आणि संवर्धन होणे आवश्यक आहे. राम नदी उंचावर असल्यामुळे मुळा-मुठेच्या तुलनेत राम नदीचे शुद्धीकरण करणे अधिक सोपे आहे. राम नदी शुद्धीकरण प्रकल्प यशस्वीरीत्या राबवून देशासमोर एक यशस्वी प्रारूप उभे करणे शक्य आहे."

Service By: Vidisha Media Network- 9881736077